18.09.2024 प्रभातःमुरली ओम शांती बापदादा मधुबन

"गोड मुलांनो - तुम्ही आहात धरतीवरील चैतन्य तारे, तुम्हाला साऱ्या विश्वाला प्रकाश द्यायचा आहे"

प्रश्नः- शिवबाबा तुम्हा मुलांची काया कांचन सारखी कशी बनवतात?

उत्तरः- ब्रह्मा मातेद्वारे तुम्हाला ज्ञान दूध पाजून तुमची काया कांचन बनवितात, म्हणूनच त्यांच्या महिमेमध्ये गातात - 'त्वमेव माताश्च पिता…'. आता तुम्ही ब्रह्मा मातेद्वारे ज्ञान दूध पित आहात, ज्यामुळे तुमची सर्व पापे नष्ट होतील. तुम्ही कांचन बनाल.

ओम् शांती. रूहानी बाबा बसून समजावून सांगत आहेत - जसे आकाशामध्ये तारे आहेत तसे तुम्हा मुलांसाठी देखील गायले जाते - 'यह धरती के सितारे हैं'. त्यांना (आकाशातील ताऱ्यांना) देखील नक्षत्र देवता म्हटले जाते. आता ते काही कोणते देवता तर नाही आहेत. तुम्ही तर त्यांच्यापेक्षा महान बलवान आहात कारण तुम्ही तारे साऱ्या विश्वाला प्रकाशित करता. देवता बनणारे तुम्हीच आहात. तुमचेच उत्थान आणि पतन होते. ते फारफार तर सृष्टीरुपी मंडपाला प्रकाश देतात, त्यांना काही देवता म्हणणार नाही. तुम्ही देवता बनत आहात. तुम्ही साऱ्या विश्वाला प्रकाशमय करणारे आहात. आता साऱ्या विश्वामध्ये घोर अंधार आहे. पतित बनले आहेत. आता बाबा तुम्हा गोड-गोड मुलांना देवता बनविण्यासाठी आले आहेत. मानव तर सर्वांनाच देवता समजतात. सूर्याला देखील देवता म्हणतात. काही ठिकाणी तर सूर्याचा झेंडा सुद्धा लावतात. स्वतःला देखील सूर्यवंशी म्हणतात. वास्तविक तुम्ही सूर्य-वंशी आहात ना. तर बाबा बसून तुम्हा मुलांना समजावून सांगत आहेत. भारतामध्येच घोर अंधार झाला आहे. आता भारतामध्येच प्रकाश पाहिजे. बाबा तुम्हा मुलांना ज्ञान अंजन देत आहेत. तुम्ही सर्व अज्ञाननिद्रेमध्ये झोपला होता, बाबा येऊन पुन्हा जागे करतात. म्हणतात - 'ड्रामा प्लॅन अनुसार कल्प-कल्पाच्या पुरुषोत्तम संगमयुगावर मी पुन्हा येतो'. हे पुरुषोत्तम संगमयुग कोणत्याही शास्त्रांमध्ये नाही आहे. या युगाला आता तुम्ही मुलेच जाणता, जेव्हा की तुम्ही तारे पुन्हा देवता बनत आहात. तुम्हालाच म्हणणार - 'नक्षत्र देवताये नमः'. आता तुम्ही पुजारी पासून पूज्य बनता. तिथे (सतयुगामध्ये) तुम्ही पूज्य बनता, हे देखील समजून घ्यायचे आहे ना. याला रूहानी शिक्षण म्हटले जाते, यात कधी कुणामध्ये युद्ध होत नाही. टीचर साधारण पद्धतीने शिकवतात आणि मुले देखील साधारण रीतीने शिकतात. यामध्ये कधी कोणत्या युद्ध इत्यादीची गोष्टच नाही. हे (ब्रह्मा बाबा) असे थोडेच म्हणतात की मी भगवान आहे. तुम्ही मुले देखील जाणता शिकविणारे इनकार्पोरियल (निराकार) शिवबाबा आहेत. त्यांना आपले स्वतःचे शरीर नाहीये. म्हणतात - 'मी या रथाला (ब्रह्मा बाबांचे शरीर) लोनमध्ये घेतो. भागीरथ देखील का म्हणतात? कारण अतिशय भाग्यशाली रथ आहे. तेच मग विश्वाचे मालक बनतात तर 'भागीरथ' झाले ना. तर प्रत्येक गोष्टीचा अर्थ समजून घेतला पाहिजे ना. हे आहे सर्वात श्रेष्ठ शिक्षण. दुनियेमध्ये तर खोटेच खोटे आहे ना. म्हण देखील आहे ना - 'सच की नईया डोले…'. आजकाल तर अनेक प्रकारचे भगवान निघाले आहेत. स्वतःला तर सोडाच परंतु दगड-धोंड्याला सुद्धा भगवान म्हणतात. भगवंताला किती भरकटवले आहे. बाबा बसून समजावून सांगतात, जसे लौकिक पिता मुलांना समजावून सांगतात; परंतु ते लौकिक पिता काही असे नाहीत की पिता देखील आहेत, तेच टीचर देखील आहेत आणि तेच गुरु देखील आहेत. आधी पित्याकडे जन्म घेतात, मग थोडे मोठे झाल्यानंतर टीचर पाहिजे शिकविण्यासाठी. आणि मग ६० वर्षानंतर गुरु पाहिजे. हे तर एकच पिता, टीचर, सद्गुरु आहेत. ते म्हणतात - मी तुम्हा आत्म्यांचा पिता आहे. शिकते देखील आत्माच. आत्म्याला आत्मा म्हटले जाते. बाकी शरीरांची नावे अनेक आहेत. विचार करा - हे आहे बेहदचे नाटक. 'बनी बनाई बन रही…'. काही नवीन गोष्ट नाहीये. हा अनादि पूर्वनियोजित ड्रामा आहे जो फिरतच राहतो. पार्टधारी आत्मे आहेत. आत्मा कुठे राहते? म्हणतील आम्ही आमच्या घरी परमधाममध्ये राहणारे आहोत नंतर मग आम्ही इथे येतो बेहदचा पार्ट बजावण्यासाठी. बाबा तर सदैव तिथेच राहतात. ते पुनर्जन्मामध्ये येत नाहीत. आता तुम्हाला रचता बाबा, आपले आणि रचनेचे सार ऐकवतात. तुम्हाला म्हटले जाते स्वदर्शन चक्रधारी मुले. दुसरा कोणी याचा अर्थ देखील समजू शकणार नाही कारण ते (दुनियावाले) तर समजतात स्वदर्शन चक्रधारी तर विष्णू आहे, हे मग मनुष्यांना का म्हणतात? हे केवळ तुम्हीच जाणता. जेव्हा तुम्ही शूद्र होता तेव्हा देखील मनुष्यच होता, आता ब्राह्मण बनले आहात तरी देखील मनुष्यच आहात मग जेव्हा देवता बनणार तेव्हा देखील

मनुष्यच राहणार, परंतु कॅरेक्टर (चारित्र्य) बदलते. रावण येतो तर तुमचे चारित्र्य किती बिघडते. सतयुगामध्ये हे विकार असतच नाहीत.

आता बाबा तुम्हा मुलांना अमर कथा ऐकवत आहेत. भक्ती मार्गामध्ये तुम्ही किती कथा ऐकल्या असतील. असे म्हणतात अमरनाथने पार्वतीला कथा ऐकवली. आता तिला तर शंकर ऐकवतील ना. शिव कसे ऐकवतील. पुष्कळ मनुष्य जातात ऐकण्यासाठी. या भक्ती मार्गातील गोष्टी बाबा बसून समजावून सांगतात. बाबा असे म्हणत नाहीत - भक्ती काही खराब आहे. नाही, हा तर ड्रामा जो अनादि आहे, तो समजावून सांगितला जातो. आता बाबा म्हणतात - एक तर स्वतःला आत्मा समजा. मूळ गोष्टच ही आहे. भगवानुवाच - मनमनाभव. याचा अर्थ काय आहे? हे बाबा बसून मुखावाटे ऐकवतात तर हे गोमुख आहे. हे देखील समजावून सांगितले आहे - 'त्वमेव माताश्च पिता...'. त्यांनाच म्हणतात. तर या मातेद्वारे तुम्हा सर्वांना ॲडॉप्ट केले आहे. शिवबाबा म्हणतात या मुखाद्वारे तुम्हा मुलांना ज्ञान दूध पाजतो तर तुमची जी पापे आहेत ती सर्व भस्म होऊन तुमची आत्मा कांचन बनते. तर काया (शरीर) देखील कांचन मिळते. आत्मे एकदम प्युअर कांचन बनतात मग हळू-हळू शिडी उतरतात (अधोगती होते). आता तुम्हाला समजले आहे आपण आत्मे देखील कांचन होतो, शरीर देखील कांचन होते मग ड्रामा अनुसार आपण ८४ च्या चक्रामध्ये आलो आहोत. आता कांचन नाही आहोत. आता तर नऊ कॅरेटचे आहोत असे म्हणणार, बाकी थोडे टक्के शिल्लक राहिले आहोत. एकदम प्रायःलोप नाही म्हणणार. काही ना काही शांती बाकी असते. बाबांनी ही खूण देखील सांगितली आहे. लक्ष्मी-नारायणाचे चित्र आहे नंबर वन. आता तुमच्या बुद्धीमध्ये पूर्ण चक्र आले आहे. बाबांचा परिचय देखील बुद्धीमध्ये आला आहे. भले आता तुमची आत्मा पूर्ण कांचन बनलेली नाही आहे परंतु बाबांचा परिचय तर बुद्धिमध्ये आहे ना. कांचन होण्याची युक्ती सांगतात. आत्म्यामध्ये जो कचरा पडला आहे तो निघणार कसा? त्यासाठी आहे आठवणीची यात्रा. याला म्हटले जाते युद्धाचे मैदान. तुम्ही प्रत्येकजण युद्धाच्या मैदानावर स्वतंत्र सैनिक आहात. आता प्रत्येकाने जितका पाहिजे तितका पुरुषार्थ करावा. पुरुषार्थ करणे तर स्टुडंटचे काम आहे. कुठेही जा, एकमेकांना सावध करत रहा - मनमनाभव. शिवबाबांची आठवण आहे? एकमेकांना हाच संकेत द्यायचा आहे. बाबांचे शिक्षण एक संकेत आहे तेव्हाच तर बाबा म्हणतात, एका सेकंदामध्ये काया कांचन होते. विश्वाचा मालक बनवते. बाबांची संतान बनता तर विश्वाचे मालक बनता. मग विश्वामध्ये आहे बादशाही. त्यामध्ये उच्च पद मिळविणे - हे आहे पुरुषार्थ करणे. बाकी सेकंदामध्ये जीवनमुक्ती. बरोबर तर आहे ना. पुरुषार्थ करणे प्रत्येकावर अवलंबून आहे. तुम्ही बाबांची आठवण करत रहा तर आत्मा एकदम पवित्र होईल. सतोप्रधान बनून सतोप्रधान दुनियेचे मालक बनाल. किती वेळा तुम्ही तमोप्रधाना पासून परत सतोप्रधान बनले आहात! हे चक्र फिरतच राहते. याचा कधी अंत येत नाही. बाबा किती चांगल्या रीतीने बसून समजावून सांगतात. म्हणतात - 'मी कल्प-कल्प येतो. तुम्ही मुले मला घाणेरड्या दुनियेमध्ये निमंत्रण देता. कसले निमंत्रण देता?' तुम्ही म्हणता - 'आम्ही जे पतित बनलो आहोत, तुम्ही येऊन पावन बनवा.' वाह तुमचे निमंत्रण! म्हणता - 'आम्हाला शांतीधाम-सुखधाममध्ये घेऊन चला'; तर मी तुमचा ओबीडियंट सर्व्हेंट (आज्ञाधारक सेवाधारी) आहे. हा देखील ड्रामाचा खेळ आहे. तुम्ही समजता - आपण कल्प-कल्प तेच शिकतो, पार्ट बजावतो. आत्माच पार्ट बजावते. इथे बसलेले असताना देखील बाबा आत्म्यांना बघतात. ताऱ्यांना बघतात. आत्मा किती छोटीशी आहे. जसे तारे लुकलुकत असतात. कोणता तारा खूप तेजस्वी असतो, कोणता सौम्य, तर कोणी चंद्राच्या जवळ असतात. तुम्ही देखील योगबलाने चांगल्या रीतीने पवित्र बनता तेव्हा मग चमकू लागता. बाबा देखील म्हणतात - मुलांमध्ये जे खूप चांगले नक्षत्र आहेत, त्यांना फूल द्या. मुले देखील एकमेकांना जाणतात ना. खरोखर कोणी खूप हुशार असतात, कोणी खूप आळशी असतात. त्या ताऱ्यांना देवता म्हणू शकत नाही. तुम्ही देखील आहात मनुष्य परंतु तुमच्या आत्म्याला बाबा पवित्र बनवून विश्वाचा मालक बनवितात. बाबा वारशाच्या रूपामध्ये किती ताकद देतात. ऑलमाइटी बाबा आहेत ना. बाबा म्हणतात - 'मी तुम्हा मुलांना इतकी माइट (शक्ती) देतो'. गातात देखील ना - 'शिवबाबा, तुम्ही तर आम्हाला शिकवून मनुष्यापासून देवता बनवता. वाह!' असे तर कोणीच बनवत नाही. शिक्षण सोर्स ऑफ इन्कम आहे ना. सारे आकाश, धरती इत्यादी सर्वकाही आमचे होते. कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. याला म्हटले जाते - अडोल राज्य. कोणीही खंडीत करू शकत नाही. कोणी जाळू शकत नाही. तर अशा बाबांच्या श्रीमतावर चालले पाहिजे ना. प्रत्येकाला स्वतःचा पुरुषार्थ करायचा आहे.

मुले म्युझियम वगैरे बनवितात - या चित्रांद्वारे हमजीन्सना (आपल्या बरोबरीच्यांना) समजावून सांगा. बाबा

डायरेक्शन देत राहतात - जे चित्र पाहिजे ते भले बनवा. बुद्धी तर सर्वांची काम करत असते. मनुष्यांच्या कल्याणासाठीच ही बनविली जातात. तुम्ही जाणता सेंटरवर जेव्हा कोणी येतात, तर आता अशी कोणती युक्ती रचावी जेणेकरून लोक आपणहून मिठाई घेण्यासाठी (ज्ञान घेण्यासाठी) येतील. कोणाकडे चांगली मिठाई असेल तर लगेच जाहिरात केली जाते. सर्वजण एकमेकांना सांगतील - 'अमक्या दुकानात जा. ही तर खूप चांगल्यात चांगली एक नंबरची मिठाई आहे. अशी मिठाई कोणाकडे मिळू शकणार नाही'. एकजण बघून गेला की बाकीच्यांना सुद्धा सांगतो. विचार तर चालतो की सर्व भारत गोल्डन एजमध्ये कसा येईल, त्यासाठी किती समजावून सांगतात परंतु पत्थर-बुद्धी आहेत, मेहनत तर करावी लागेल ना. शिकार करणे देखील शिकावे लागते ना. सुरुवातीला छोटी शिकार करायला शिकतात. मोठ्या शिकारीसाठी तर ताकद पाहिजे ना. किती मोठ-मोठे विद्वान-पंडित आहेत. वेद-शास्त्रे इत्यादी शिकलेले आहेत. स्वतःला किती मोठी ऑथॉरिटी समजतात. बनारसमध्ये त्यांना मोठ-मोठी टायटल्स (उपाध्या) मिळतात. यासाठी बाबांनी सांगितले होते की, सर्वात आधी बनारसमध्ये सेवेचा घेराव घाला. मोठ्यांचा आवाज निघेल तेव्हा कोणीतरी ऐकतील. छोट्यांनी सांगितलेले कोणी ऐकत नाहीत. अशा वाघांना समजावून सांगायचे आहे जे स्वतःला शास्त्रांची ऑथॉरिटी समजतात. किती मोठ-मोठ्या उपाध्या देतात. शिवबाबांच्या सुद्धा इतक्या उपाध्या नाही आहेत. भक्ती मार्गाचे राज्य आहे ना नंतर होते ज्ञानमार्गाचे राज्य. ज्ञानमार्गामध्ये भक्ती असत नाही. भक्तीमध्ये मग ज्ञान अजिबात असत नाही. तर हे बाबा समजावून सांगत आहेत - बाबा बघतात देखील असे, जसे की हे तारे बसले आहेत. देहाचे भान सोडून द्यायचे आहे. जसे वर आकाशात तारे चमकत आहेत तसे इथे देखील तारे चमकत आहेत. काही-काही तर अतिशय तेजस्वी बनले आहेत. हे आहेत धरतीवरील तारे ज्यांना देवता म्हटले जाते. हा किती मोठा बेहदचा मंडप आहे. बाबा समजावून सांगत आहेत की, ती आहे हदची रात्र आणि दिवस. ही आहे मग अर्ध्याकल्पाची रात्र आणि अर्ध्याकल्पाचा दिवस, बेहदचा. दिवसामध्ये सुखच सुख आहे. कुठेही त्रास सहन करण्याची गरज नाही. ज्ञानामध्ये आहे - सुख, भक्तीमध्ये आहे - दुःख. सतयुगामध्ये दुःखाचे नाव सुद्धा नाही. तिथे काळ असत नाही. तुम्ही काळावर विजय प्राप्त करता. मृत्यूचे नाव असत नाही. ते आहे अमर लोक. तुम्ही जाणता बाबा आपल्याला अमर कथा ऐकवत आहेत अमरलोकसाठी. आता तुम्हा गोड-गोड मुलांच्या बुद्धीमध्ये अगदी वर पासून पूर्ण चक्र आहे. तुम्ही जाणता की आम्हा आत्म्यांचे घर आहे - ब्रह्मलोक. तिथून इथे नंबरवार येतो पार्ट बजावण्यासाठी. पुष्कळ आत्मे आहेत, एका-एकाला थोडेच सांगत बसतील. नटशेल (थोडक्यात) सांगतात. किती शाखा-उपशाखा आहेत. वाढत-वाढत झाडाची वृद्धी होते. बरेच असे आहेत ज्यांना आपल्या धर्माविषयी सुद्धा काहीच माहिती नाही आहे. बाबा येऊन समजावून सांगतात - 'तुम्ही खरे तर देवी-देवता धर्माचे आहात परंतु आता धर्म भ्रष्ट, कर्म भ्रष्ट बनले आहात.

आता तुम्हा मुलांच्या बुद्धीमध्ये आहे की आपण खरे तर शांतीधामचे रहिवासी आहोत नंतर मग येतो पार्ट बजावण्यासाठी. या लक्ष्मी-नारायणाचे राज्य होते, यांचे घराणे होते. परत आता संगमावर उभे आहेत. बाबांनी सांगितले आहे तुम्ही सूर्यवंशी होता नंतर चंद्रवंशी बनलात. बाकी मध्यभागी आहेत बाईप्लॉट्स. हा बेहदचा खेळ आहे. हे किती छोटे झाड आहे. ब्राह्मणांचे कुळ आहे. मग किती मोठे होईल, सर्वांना पाहू अथवा भेटू देखील शकणार नाहीत. जिथे-तिथे घेराव घालत जातात. बाबा म्हणतात - 'दिल्लीला, बनारसला घेराव घाला. मग ते असे म्हणतात की सर्व दुनियेला तुम्ही घेराव घालणारे आहात. तुम्ही योगबलाने सर्व दुनियेमध्ये एका राज्याची स्थापना करत आहात, किती खुशी होते. कोणी कुठे, कोणी कुठे जात राहतात. आता तुमची कोणतीच गोष्ट ऐकत नाहीत. जेव्हा मोठ-मोठ्या व्यक्ती येतील, वर्तमानपत्रांमध्ये येईल तेव्हा समजतील. आता छोटी-छोटी शिकार होते. मोठ-मोठे श्रीमंत लोक तर समजतात आमच्यासाठी इथेच स्वर्ग आहे. गरीबच येऊन वारसा घेतात. बाबांना म्हणतात - 'बाबा माझ्यासाठी तर तुम्हीच दुसरे कोणीच नाही'; परंतु साऱ्या दुनियेपासून मोह आसक्ती तुटेल तेव्हा ना. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. २) या बेहदच्या पूर्वनियोजित नाटकाला चांगल्या रीतीने समजून घेऊन स्वदर्शन चक्रधारी बनायचे आहे. ज्ञान अंजन देऊन मनुष्यांना अज्ञानाच्या घोर अंधारातून बाहेर काढायचे आहे.

वरदान:- बालक सो मालक या स्मृतीद्वारे सर्व खजिन्यांना आपले बनविणारे स्वराज्य अधिकारी भव यावेळी तुम्ही मुले फक्त बालक नाही आहात परंतु बालक सो मालक आहात, एक तर स्वराज्य अधिकारी मालक आणि दुसरे बाबांच्या वारशाचे मालक. जेव्हा स्वराज्य अधिकारी आहात तर स्वतःची सर्व कर्मेंद्रिये ऑर्डर प्रमाणे असावीत. परंतु वेळोवेळी मालकीपणाच्या स्मृतीला विसरून वशमध्ये करणारे हे मन आहे म्हणूनच बाबांचा मंत्र आहे - मनमनाभव. मनमनाभव राहिल्याने कोणत्याही व्यर्थ गोष्टीचा प्रभाव पडणार नाही आणि सर्व खजिने आपले असल्याचा अनुभव कराल.

बोधवाक्य:- परमात्म प्रेमाच्या झुल्यामध्ये उडत्या कलेची मजा साजरी करणे हेच सर्वात श्रेष्ठ भाग्य आहे.

||| ओम शांती |||